नि.दा.क्र.६१४/२०२४
छाया सुतार वि. आर.बी.एल.बँक व.१

## निशाणी क्रं. १३ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं. १ याने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १०(२) अन्वये दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्रं. १ ने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी क्रं. २ कडुन रक्कम वसुलीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं. १ ही बँक असुन त्याचे कामकाज भारतीय रिझर्व बँकेचे नियमानुसार कायदेशीररित्या चालते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रं. १ यांना नाहक पक्षकार म्हणुन दाव्यात सामील करणे कायदयाने योग्य नाही. वादीने प्रतिवादी क्रं. १ विरुध्द दावा दाखल करण्याचे कोणतेही कायदेशीर कारण दिलेले नाही. वादीने दाव्यात मागितलेली दाद पाहता प्रतिवादी क्रं. १ हे याकामी आवश्यक पक्षकार राहत नाहीत. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १०(२) प्रमाणे प्रतिवादी क्रं. १ ची दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन गरज नसल्याने प्रतिवादी क्रं. १ यांना दाव्यातून वगळवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातुन प्रतिवादी क्रं. १ यांना वगळयाची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहे. वादी कथन करते की, प्रस्तुत अर्ज खोटा असुन तो वादीस मान्य नाही. सदर दाव्यात नमुद व्यवहाराची संपूर्ण माहिती प्रतिवादी क्रं. १ यांना असुन ते त्यास जबाबदार आहेत. प्रस्तुत दावा दाखल करणेचे अगोदर प्रतिवादी यांना महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६४ अन्वये रजिस्टर नोटीस दिनांक २२/०१/२०२४ रोजी दिलेली होती.

प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज वादीस नाहक त्रास देण्यासाठी व दाव्यात गुतांगुत वाढविणेसाठी केलेला असल्याने तो कायदेशीर नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्रं. १ चे अर्ज व वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादी क्रं. २ कडुन रक्कम वसुलीकरीता दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्रं. २ हिने वादीच्या नावे प्रतिवादी क्रं. १ बॅकेमध्ये कर्ज प्रकरण करुन रक्कम वापरलेली आहे. सदर रक्कमेचे हप्ते प्रतिवादी क्रं. २ ही परस्पर बॅकेमध्ये जमा करीत होती. परंतु हप्ते न भागविल्यामुळे वादीला बॅकेतर्फे नोटीस पाठविणेत आली. त्यामुळे प्रतिवादी क्रं. २ हिच्या विरुध्द वादीच्या नावे घेतलेल्या कर्जाची रक्कम व्याजासहित मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं. १ ही बॅक असुन नियमानिशी सर्व कागदपत्रांचे आधारे वादीच्या नावे कर्ज दिलेले आहे. वादी व प्रतिवादी क्रं. २ या दोघीही प्रतिवादी क्रं. १ बॅकेच्या सभासद आहेत. दाव्याचे मागणी पाहिले असता प्रतिवादी क्रं. १ विरुध्द कोणतीही मागणी केलेली नाही. शिवाय प्रतिवादी क्रं. १ विरुध्द कोणतीही दाद मागितलेली नाही. प्रतिवादी क्रं. १ कडुन वादीच्या नावे कर्ज प्रकरण घेतले असल्याचे वादीस मान्य आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ विरुध्द कोणतीही दाद नसल्याकारणाने प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं. १ हा आवश्यक पक्षकार नाही. दावा न्यायनिर्णयीत झालेनंतर प्रतिवादी क्रं. १ विरुध्द कोणतीही दाद वादीला मिळणार नाही. नाहक प्रतिवादी क्रं. १ यास प्रस्तुत दाव्याकामी न्यायालयात हजर रहावे लागत आहे. प्रतिवादी क्रं. १ ची या दाव्यामध्ये आवश्यकता नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित वाटते. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र.१३ चा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादीने नियमानुसार १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये दुरुस्ती करुन प्रतिवादी क्रं. १ चे नाव कमी करुन दुरुस्ती दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी. |

AADITYA AVINASH VYAS
Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2025.12.06 17:54:14 +0530

**(आदित्य अ. व्यास)**

दिनांक : ०६.१२.२०२५

२रे सह दिवाणी न्यायाधिश,क.स्तर,
माळशिरस

## CERTIFICATE

I affirm that the contents of the P.D.F file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer :- S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C, Malshiras, Dist. Solapur

(c) Order signed by P.O. On :- 06/12/2025.

(d) Order uploaded on :- 06/12/2025.